REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# गांधीजींच्या चळवळीत स्त्रियांचे योगदान

डॉ. नभा काकडे
सहयोगी प्राध्यापिका , सोशल महाविदयालय सोलापूर.

## प्रस्तावना :



मानवी इतिहासाचा अभ्यास करताना त्या त्या कालखंडात संपूर्ण समाज हलविण्याची असामान्य शक्ती ज्या यक्तिंमध्ये असते, त्या व्यक्तिच्या विचारांचा आधार घ्यावाच लागतो. अशा व्यक्तीमत्वांमधील सामर्थ्य म्हणजे लक्षावधी लोकांच्या आशा व आकांक्षांचा व्यक्त झालेला उद्‌गार असतो . त्यातील एक व्यक्तीत्व- म.गांधी

सृष्टीतील इतर प्राण्यांपेक्षा वेगळा आकार, वेगळी जीवन पध्दती, उपजिवीकेची वेगळी साधने असणाऱ्या मानवाची निर्मिती कधी झाली हा प्रश्न गूढ आहेच. परंतु याच मानवाने निर्माण केलेल्या संस्कृतीमध्ये स्त्री म्हणून संबोधल्या गेलेल्या मानवास काय स्थान दिले व समाजाने या मानवाशी कसे वर्तन केले याचा अभ्यास अनेक समाजसुधारक, विचारवंतांनी केला. सुधारणेच्या चळवळीत त्यांचा सहभाग नोंदवला. परंतु राजकीय चळवळीत भारतात प्रथमच मोठया प्रमाणात सहभाग नोंदवला गेला तो गांधीजींनी. स्वातंत्र्यासाठी केलेल्या चळवळीमध्ये स्त्रियांच्या शक्तीला एक नवे रूप देवून संघर्षात योगदान देण्याची संधी त्यांना उपलब्ध करून दिली आणि निद्रीस्थ महिला समुहाला विचाराने व कृतीने गतीमान केले. चळवळीतील दृढ व स्पंदनशील वातावरणात त्यांना सामावून घेण्याचे श्रेय म.गांधींना जाते .

'ज्या देशात स्त्रिला सन्मान नाही, त्या देशाला सुसंस्कृत म्हणता येणार नाही. स्त्री ही अहिंसा व स्वार्थ त्याग याची जीवंत मृती असून तिच्याशिवाय अहिंसा हे तत्व सत्य सृष्टीत उतरणे शक्य नाही .' असा विचार मांडणाऱ्या म.गांधी यांनी परंपरेने दिलेल्या दास्यत्वातून बाहेर पडून स्वातंत्र्य चळवळीत आणि विधायक व रचनात्मक कार्यात आपले योगदान दयावे असे आवाहन केले, स्त्रीयांनीही प्रचंड प्रतिसाद दिला आणि त्यांचे सामर्थ्य प्रज्वलीत लढयात आंदोलित झाले, एवढया मोठया राजकीय रणांगणात उतरण्यास उद्युक्त झाल्या हा इतिहास अभुतपूर्व आहे. स्त्रीयांमधील अमोघ सामर्थ्य, तेज, त्याग - बलिदानाची ताकद, भक्ती याची जाणीव गांधीजींना होती. त्यांच्या समोर संत मीराबाईंचे उदाहरण होते. त्यांनी जवळपास पन्नास वेळा आपल्या भाषण, पत्र लेखणातून मीराबाईंचा उल्लेख केलेला आहे. सर्वप्रथम त्यांनी २२ जून १९०७ उल्लेख करताना म्हटले आहे की, मीराबाईसारख्या हजारो स्त्रियांची देशाला आवश्यकता आहे, जी जागृती करू शकेल. ११ जून १९१७ ला आपल्या मित्राला लिहिलेल्या पत्रातही याचा उल्लेख आहे. ते मीराबाईस भरताची एक 'महातेजस्वीनी भक्त स्त्री , सत्याग्रहीणी, महानत्यागी व बलिदानी असे मानतात '. त्यांनी मीराबाईच्या या गुणांचा भारताच्या स्वातंत्र्याआंदोलनाशी संबंध जोडून भारतीय स्त्रियांमध्ये आंदोलनामध्ये कृतीशील सहभाग देण्याची उर्जा चेतवली . सरोजिनी नायडू यांना ते मीराबाई म्हणत. असहकार आंदोलनामध्ये विद्यार्थ्यांना ते आवाहन करतात की मीराबाईप्रमाने त्या व बलिदानामध्ये आनंद व समाधानाची अनुभूती घ्यावी.

रुढीवादी भारतीय समाजामध्ये स्त्रियांच्या स्थानाची जाणीव व त्यामुळे असणाऱ्या व होणाऱ्या अधोगतीचे भान ठेवून राजकारणाला नैतिकता, तात्विकता व मानवता यांचे अधिष्ठान असले पाहिजे, त्याशिवाय स्वातंत्र्याला आणि स्वातंत्र्यानंतरच्या राष्ट्रउभारणीच्या स्वप्नांना काहीही अर्थ नाही अशी म.गांधी यांची भूमिका होती. यासाठी काही मूल्यांना ते महत्व देतात. स्वाभिमान, स्वनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा, स्वावलंबन, आत्मभान , धैर्य, त्याग, बलिदान, राजकीय असामाजिक व्यवहार्यता या तत्वांचा या मूल्यांमध्ये ते समावेश करतात. या मूल्यातून स्वातंत्र्यप्राप्ती हे ध्येय आणि स्वातंत्र भारताची लोकशाही टिकवणे, विकसित करणे या जबाबदारीची जाणीव प्रत्येक नागरीकाला होईल व या प्रत्येक नागरीकात प्रत्येक स्त्री व पुरुषाचा समावेश असावा हा त्यांच्या राजकीय चळवळीचा आणि रचनात्क कार्याचा गाभा होता. म्हणूनच सर्व सहभाग हा चळवळीचा पाया होता . हे विचार गांधीजींचे राजकारणाचे कौशल्य आणि मानवतेप्रती संवेदना स्पष्ट करतात.

य.दि.फडके एकदा भाषणात म्हणाले होते, 'गांधी युगात समाजातील विविध लोकसमूदायातील, विविध स्तरातील, वर्गातील व धर्मातील स्त्रियांचे सबलीकरण व मुक्तता घडून आली. या स्त्रियांनी तन- मन- धनानी क्रांतीकारक व अहिंसक चळवळीत स्वताला झोकून दिले. परंतु त्यांच्या सहभागाचे लेखन अर्धवट आहे. समाजातील उच्चवर्णिय स्त्रियांच्या सहभागाविषयी ठसठशीतपणे लिहिले गेले, पण ज्यांचे योगदान प्रशंसनीय आहे अशा अदिवासी स्त्रिया अशिक्षित, अर्धशिक्षित, ग्रामीण, परदेशी, दलित स्त्रियांच्या योगदानावर प्रकाश टाकणे आवश्यक आहे.' हे मान्य करून गांधी युगात महिलांच्या सहभागाबद्दल विविध कार्यापध्दतीबद्दल चर्चा करणे उद्‌बोधक ठरेल.

स्वातंत्र्याच्या चळवळीत हजारो भारतीय तुरुंगात जावू लागले तेव्हा भारतातल्या स्त्रियांवर अत्यंत विश्वासाने गांधीजींनी पुढील कार्याची धुरा ठेवली . म्हणूनच १९२० च्या असहकार चळवळीपेक्षा १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या व मिठाच्या सत्याग्रहात अधिक संख्येने व त्याहीपेक्षा १९४२ च्या चळवळीपर्यंत ही संख्या प्रचंड वाढली. दांडीयात्रेत गांधीजींनी ७९ सत्याग्रहींची निवड केली होती. यात एकही स्त्री नव्हती . एकही स्त्री आपल्या बरोबर चालण्यास योग्य नाही का ? असा प्रश्न त्यांना विचाराण्यात आला तेव्हा त्यांनी उत्तर दिले होते की, गांधीनी महिलांना पुढे केले म्हणून आम्हाला लाठी हल्ला करता आला नाही अशी सबब ब्रिटिशांना मिळाली असती . ती मिळू नये म्हणून महिलांचा समावेश केला नाही. पुढील जास्त प्राक्रमाच काम देण्यासाठी त्यांना राखीव ठेवण्यात आलेलं आहे. ही आठवण नारायण भाई देसाई आपल्या अज्ञात गांधी या पुस्तकात सांगतात. याचवेळी वल्लभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली बारडोली येथे सविनय कायदेभंगाची चळवळी शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी चालू होती. यातही स्त्रियांचा मोठया सहभाग होता. मीठाबाई, नावाच्या शेतकरी महिलेने सत्याग्रहातच वल्लभभाई पटेल यांना 'सरदार' असे संबोधन दिले आणि संपूर्ण देशाने हे संबोधन सन्मानपूर्वक स्विकारले. सविनय कायदेभंगच्या चळवळीच्या प्रभावाने व जागृतीची आवश्यकतेतून लेखिकांनीही आपली जबाबदारी पार पाडली. सुभ्रदाकुमारी चौहान यांच्या 'पापी पेट , एकादशी, हिंगवाला, आमराई या त्यांच्या कथा यावरच आधारित होत्या.' 'विरोंका कैसा हो वसंत' ही त्यांचीच कविता आहे. १९२०-१९४७ या काळात चळवळीचे स्वरूप परिस्थितीने बदलत गेले. १९४२ च्या लढयात बॉम्ब, पिस्तुल हे शब्द येतात. १९२० च्या व १९३० चळवळीत खादी, सुत कताई, दारूबंदी इ. शब्द येतात. याची कारणे आहेत.

खादी व सूत कताई हा कार्यक्रम १९२० पासूनच स्वातंत्र्याच्या चळवळीशी स्वदेशीच्या माध्यमातून गांधीजींनी जोडला, सूत कताई करणे व खादी वापरणे हे राष्ट्रीयतेचे, जागृतीचे प्रतिक होण्यासाठी महिला समाविष्ट असणे गरजेचे होते, किंबहुना महिलांचा समावेश वाढविण्यासाठी ही प्रतिके उपयोगी पडतील म्हणून घराघरातून खेडयाखेडयातून, स्त्रियांच्या जागृतीचे त्यांनी माध्यम बनविले. १९३० मध्ये दारूबंदी व मिठाच्या करास विरोध या दोन माध्यमातून स्त्रिया चळवळीशी जोडल्या जातील असा त्यांचा विश्वास होता. यातून त्यांना दोन गोष्टी साध्य करावयाच्या होत्या. एकीकडे दारू व मिठाचा कर या दोन्ही वस्तूंमधून ब्रिटिश सरकारला भरपूर पैसा मिळत होता. दुसरीकडे याच दोन वस्तूंमुळे घराघरातील आर्थिक चणचण वाढत होती. याच भावनेला त्यांनी राष्ट्रीय चळवळीची ताकद बनविले. महिलांच्या सहभागाचे हे महत्वाचे कारण ठरले. १९४२ मात्र राष्ट्रीय स्वाभिमान व कौसोटीची परिस्थिती निर्माण झाली. त्याग , बलिदान, राष्ट्रीयता या शब्दांच्या सार्थकतेचा क्षण आला होता. ८ ऑगस्टला गांधीजींनी ' करू अथवा मरू' हा नारा दिला आणि आंदोलनाचे स्वरूपच पालटले . ब्रिटिशांनी अटक सत्र सुरू केल्यामुळे सर्व नेते तुरुंगात. त्यामुळे सैरभैर झालेल्या लोकांनी ' करू अथवा मरू' याचा शब्दाशः अर्थ घेवून ते रस्त्यावर उतरले. नेतृत्वहीन चळवळीचे स्वरूप पूर्णतः अहिंसक राहिले नाही. याच वेळी स्त्रियांनी बॉम्बचे साहित्य लपवले. पिस्तुले नेवून पोहोचविली अशा घटना घडल्या त्यामुळे स्त्रियांना केवळ मानवातावादी दृष्टीकोनातून वागणूक देण्यापेक्षा आत्मनिष्ठ व निर्णयक्षम, धाडसी बनवून स्वातंत्र्याच्या चळवळी बळकट करणे व ब्रिटिश सरकारला निष्प्रभ करणे या गांधीजींच्या उद्दिष्टाचे फलित होते . गांधीजींची चळवळ अहिंसक राहिली नाही. मुस्लिम लीगचा डायरेक्ट ॲक्शन डे, ब्रिटिशांचे धोरण अशा अनेक गोष्टी यास कारणीभूत होत्या. देशातील तणावाची परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न गांधीजी स्वातंत्र्यानंतरही करत होते. त्या असंख्य महिला त्यांच्या कार्यात सहभागी होत्या.

गांधीजींच्या चळवळीतील स्त्रियांच्या सहभागाचा आलेख वाढता होता तो गांधीजींच्या विचारानेच. १९२० पासून १९४२ व पुढे १९४७ पर्यंत चळवळी परिपक्व होत गेली. कारण सत्याग्रहाच्या प्रत्येकउपक्रमामध्ये विधायक कार्याला गांधीजींनी अग्रस्थान दिले आणि यात महिला मोठा घटक ठरला. खऱ्या अर्थाने देशव्यापी चळवळी उभारणे हे सर्वमान्य होते. परंतु या 'देशव्यापी ' मध्ये गांधीजींना देशाचा अर्धा भाग असणारा स्त्री वर्ग जो अपेक्षित होता या अर्थाने .

देशाच्या विविध भागात, विविध स्तरावर चळवळीत कार्या करणाऱ्या सर्वच स्त्रियांची माहिती या स्थानी देणे शक्य नाही. परंतु काही स्त्रियांच्या कार्यावर प्रकाश टाकला तर गांधीजींच्या चळवळीतील स्त्रियांचा कृतीशील सहभाग व आज घडीला सुध्दा गांधी विचाराची प्रस्तृता लक्षात येईल .

कमलाताई काकोडकर यांनी १९४२ आंदोलनात भूमिगत राहून कार्य केले. त्यांच्या मुंबई येथील घरात महाराष्ट्र चरखा संघटनेचे अनेक कार्यकर्ते भूमिगत राहून कार्य करीत. भूमिगत आकाशवाणी केंद्र ही ते चालवित. गोवा बॉर्डरवरून गुप्तपणे काडतूसे, पिस्तुले पोचवणे, जेलमध्ये असलेल्यांना निरोप पोचविणे अशी कामे त्या करीत. सुनिता देशपांडे यांनी तर बॉम्ब तयार करण्याचे अनेक प्रयोग केले. त्याचा किती उपयोग झाला त्यापेक्षा देशासाठी प्राण पणाला लावून आपण काहीतरी करतोय याचे समाधान मात्र मिळे असे त्या म्हणतात. मृणालीनी देसाई यांचे हिंडलगा येथील तुरुंगातील अनुभव वाचून रोमांच उभे राहतात आणि गांधीजींच्या आवाहाना ला प्रतिसाद देणाऱ्या महिलांच्या शक्तीची किमया काय होती याची प्रचिती येते. त्या लिहितात, ' बराकित बराकिच्या ओटयावर पावूल ठेवायला जागा नव्हती . थोडयाच वेळात शे दोनशे

बायका आल्या. आसामी, बंगाली, पंजाबी, कानडी साऱ्याच होत्या त्या. महापूराची लाट उसळत, गर्जत आली बापूंना सोडून दया म्हणत, आसिंधूसिंधू देशगर्जना करत धावला होता. चौदा भाषांच्या श्रृंखला तुटल्या होत्या . प्रांताच्या सीमा पुसल्या होत्या. ' डॉ.कमलाबाई अष्टपुत्रे ऐरवडा तुरुंगात असताना २६ जानेवारी १९४६ ला ऐरवडच्या दरवाजाजवळ असलेल्या इलेक्ट्रीक पोलवर रात्री तिरंगा फडकाविल्याचा रोमांचकारी अनुभवानी त्या स्वतःला धन्य समजतात. इंदू भट आणि वत्सला देशमुख या दोघींनी तो फडकविला होता. झेंडा बांधायना दोरी कुठून आणणार? मग इंदूच्या साडीचा काठ फाडून वापरला. अनुसया लिमये तर येरवडयाच्या ज्या बराखीत होत्या तेथे ८० कैदयांना ठेवावे असे आरोग्यदृष्टया केलेला नियम होता. परंतु २०० स्त्री कैदयांना ठेवण्यात आलेले होते. स्त्रियांचा चळवळीत एवढा उत्स्फूर्त सहभाग होता की, तुरुंगही कमी पडत होते .

शांताबाई पत्की यांच्या पतीला तुरुंगवास झाल्यानंतर न डगमगता चळवळीचे कार्य शांताबाईनी चालू ठेवले. बॉम्ब तयार करण्याचे साहित्य त्या आपल्या घरात पाण्याच्या ओटयाखाली लपवून ठेवत. भूमिगत असलेल्या कार्यकर्त्यांना आपल्या घरात आश्रय देत . पोलिस आले तर भांडयांच्या फळीआड त्यांना लपवून ठेवण्याची सोय त्यांनी केली होती. रमाबाई पित्रे, शांता बुध्दिसागर गुप्तपणे बुलेटिन्स वाटण्याचे काम करीत. निर्मला देशपांडे हे नाव धारण करून शांताबाई विडयाच्या पानांनी झाकलेला परंतु पिस्तुलांनी भरलेला पेटारा आपल्या भावी पतीकडे माधव बुध्दिसागर यांच्याकडे पाठवला होता. अरुणा असफअली ही तर १९४२ च्या आंदोलनाची जननाईकाच जणू . अरुणा तर १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहानेच चळवळीत उतरल्या त्या गांधीजींच्या प्रेरणेने . बॅ. असफअली यांच्यावरील प्रेम व निष्ठेमुळे अरुणाला १ वर्षाची शिक्षाही झाली . आरोप मात्र सत्याग्रहाचा न लावता ती घरदार नसलेली भटकी व मुक्त बाई आहे. आपण यापुढे नीट वागू असे हमीपत्र तिने द्यावे असा निकाल ब्रिटिश न्याय व्यवस्थेने दिला मात्र अरुणाने त्यास नकार दिला. पुन्हा अटक झाली. दिल्ली येथील तुरुंगात तिला ठेवण्यात आले. जेलमधून सुटल्यानंतर पुन्हा सक्रिय होवून तिने कार्यास सुरुवात केली. १९४२ च्या आंदोलनात तर अरुणाने संपूर्ण जीवनच सर्मपित केले. ९ ऑगस्टला मुंबईच्या गवालिया टँकवर गर्दीत घुसून पोलिसांना न जुमानता ध्वजस्तंभापर्यंत धावत जावून तिरंगा फडकविला. १९४२ ते १९४६ पर्यंत पोलिसांना चुकवत फिरली. तिच्यावर वॉरंट निघाले. पकडून देणाऱ्यास ५००/- बक्षीस जाहिर करण्यात आले. परंतु कुणीही तिला पकडून दिले नाही. स्वातंत्र्यानंतर मात्र तिने स्वतंत्र्य डावा पक्ष स्थापन केला.

मणीबेन कारा १९३० च्या चळवळीत १० महिने ठाण्याच्या तुरुंगात होत्या. तुरुंगातून सुटल्यानंतर सुतकताई हा त्यांच्या जीवनाचा एक महत्वाचा भाग मानलाच, परंतु दारुबंदी साठी ही त्यांनी प्रयत्न केले. विलेपार्ले येथे त्यांनी खादी मंदिर सुरू केले. त्यांना गमतीने खादी बेन म्हणत असत. स्वातंत्र्या मिळविणे व त्याचे संरक्षण करणे या दोन्ही गोष्टी सुतकताईशी त्यांनी जोडल्या होत्या. चरखा चला चला के लेंगे स्वराज्य लेंगे हे गाणे त्या सुतकताई करताना त्या म्हणत . १९४० ला अवघ्या ३५ व्या वर्षी वैध्यव्य प्राप्त झाल्यानंतरही त्यांनी आपले कार्य चालू ठेवले. आपल्या १६ वर्षाच्या मुलीला त्यांनी चळवळीत आणले. आयुष्याच्या नव्वदीप्रयत्न स्वातंत्र्यानंतरही खादी मंदिर त्या चालवित राष्ट्रवाद व स्त्रिवाद या दोन्ही तत्वांना सारखेच महत्व देणाऱ्या मृदुला साराभाई यांनीही सविनय कायदेभंगाच्या चळवळीत तुरुंगवास भोगला. १९४२ च्या लढयातही तुरुंगात जावून आल्यानंतर १९४६ -४७ मधील जातीय दंगलीत दंगलग्रस्त बिहारमध्ये त्यांनी शांतीसैनिक म्हणून काम केले . स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पूर्व पंजाबमधील मुसलमांनाना संरक्षण देवून सुरक्षित स्थळी हलवण्यासाठी व्यवस्था करणे हिंदू शीख निर्वासितांचे पुनर्वसन करणे हे काम पं.नेहरूंनी त्यांच्यावर सोपविले होते. ते विलक्षण धैर्याने त्यांनी केले. आवंतिकाबाई गोखले या तर १९१६ साली लखनौ येथील कॉंग्रेस अधिवेशनात म.गांधीच्या संपर्कात आल्या. आणि गांधीजींनी पहिला सत्याग्रह चंपारण्य येथे केला, त्यात त्या त्यांच्याबरोबर होत्या. चंपारण्यमधील मुक्कामात यांनी म.गांधी यांचे चरित्र मराठीतून लिहिले, टिळकांनी त्यास प्रस्तावना लिहिली होती. १९३३ पर्यत त्या चळवळीत सक्रीय होत्या , त्यानंतर अस्पृश्यता निवारण, स्त्री उध्दार, सुत कताई इ.मध्ये सक्रिय राहिल्या. सरोजिनी नायडू यातर चळवळीत आघाडीवर होत्या.

पारशी समाजातील स्त्रियांना म.गांधींच्या चळवळीत योगदान आहे. मिठूबेन पेटीट यांनी १९२० मध्ये स्त्रियांसाठी खादी विभागाची 'राष्ट्रीय स्त्री सभा' ही संस्थ सुरु केली. बारडोली सत्याग्रहींच्या मदतीसाठी त्यांनी आपला भावू दिनशा पेटीट वकील यांच्या नेतृत्वाखली वकीलांचे पथक तयार करून येथील शेतकऱ्यांचे खटले चालवण्यासाठी पाठवले. परदेशी मालाची दुकाने व दारुच्या दुकानावर निर्देशने व बहिष्कार घालण्याच्या कामी त्या कस्तुरबांच्या बरोबर होत्या. १९३२ मध्ये चार महिने त्या तुरुंगात होत्या. गुजरातमधील मरोली येथे गांधीतत्वावर आधारीत आश्रम त्यांनी उभा केला. आणि शेवटच्या श्वासापर्यंत आश्रमाचे का करीत राहिल्या. दादाभाई नौरोजी यांच्या चार नाती नरगिस, खुर्शीद, पेरीन व गोशी या गांधीजींच्या प्रत्येक चळवळीत होत्या. तसेच पेरीन नसीमन व नवाज वाडिया शिरीन हवेवाला, जायबि पटेल, मेहरबानो झाबवाला, आलू दस्तुर, दिना दस्तुर, ऍलन पौछा अशा कितीतरी पारशी महिलांनी चळवळीशी बांधिलकी मानली व गांधीजींच्या विधायक कार्यात मोलाचे योगदान दिले आहे. हिराबाईचे आर्देशर टाटा व मिथान आर्देशर टाटा यातर सरोजिनी नायडू यांच्याबरोबर इंग्लंडला गेलेल्या प्रतिनिधी मंडळात होत्या.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत गांधीयुगात सक्रिय असणाऱ्या स्त्रियांमध्ये मुसलीम स्त्रिया, दलित स्त्रिया व परदेशी स्त्रियाही मोठया प्रमाणात सहभागी होत्या. श्रीमती आमेना तययबजी सकीना लुकमानी, सफिया जबीर अली या तीनही बद्रुदिदन तययबजी या कॉंग्रेस नेत्याच्या कन्या तसेच अमिना तययबजी यांच्या स्नुषा अख्तर व तययबजी यांच्या कन्या रेहेना, शरीफा तसेच, फातिमा तययबजी या सर्वांनी असंख्य

मुसलीम स्त्रियांनी १९२० ते १९४७ च्या संपूर्ण घडामोडीमध्ये इतके मोठे कार्य केलेले आहे की , त्यांच्या उल्लेखाशिवाय स्वातंत्र्यचळवळीच्या इतिहासाचे लेखन पूर्ण होवू शकत नाही.

दलित स्त्रियांच्या योगदानाबद्दल अत्यंत कमी लेखन झालेले आहे. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत चंपुताई बनसोड यांना सहा महिने तुरुंगवास व सख्त मजुरीची शिक्षा झाली. गोपिकाबाई फुलझेले यांना दारुच्या गुत्यासमोर निर्दशने केल्याबद्दल ३ महिने कारावास, ताराबाई कांबळे १९४२ च्या आंदोलनात भूमिगत कार्येकर्त्यांना आश्रय देवून मदत केली होती. धुलिबेन सोलंकी , सोनल सोलंकी, मुक्ती सर्वगोड यांच्या बरोबर शांताबाई भालेराव यांनातर पोस्ट ऑफिस व पोलिसचौक्या जाळण्यामुळे कारावास भोगावा लागला. त्याप्रमाणे पन्नादाई, महाविरा देवी, विरा पाशी, मोहंबती बाई अशा असंख्य महिलांच्या सहभागाबद्दल अधिक माहिती रोजनिशी, जुनी वृत्तपत्रे यांच्या माध्यमातून अजूनही प्रकाशात येत आहेत.

परदेशी स्त्रियांमध्ये ब्रिटिश नौसेनेचे ॲडमिरल सर एरमंड स्लेड यांची कन्या मेडिलिन या युवतीने गांधीजींच्या व्यक्तीत्व व विचारांच्या प्रभावाने भारतास आपली कर्मभूमी मानले. १९२५ मध्ये ती भारतात आली. गांधीजींनी तिला मीरा हे नाव दिले. १९४२ च्या आंदोलनात गांधीजींबरोबर महादेव भाई देसाई यांना आगाखान पॅलेस पुणे येथे नजरकैदेत ठेवण्यात आले होते. तेथे मीरा पण होती. गांधीजींच्या प्रत्येक सत्याग्रहात ती होती. इंग्लंडमध्ये भारत हा नि:कपट व सहिष्णू देश असून त्यास दासश्रृखंलेत अडकून ब्रिटनने अक्षम्य पाप केले आहे. असे म्हणण्याचे धाडस तिने केले होते. १९८२ मध्ये ऑस्ट्रेलियामध्ये तिचा मृत्यू झाला . युरियन लिस्टर ही आणखी एक ब्रिटिश युवती, जीने भारतीय संस्कृतीवर गांधीजींच्या विचाराने प्रभावित होवून संपूर्ण जीवन भारतास संर्मपित केले. १९२५ मध्ये साबरमती आश्रमात ती येवून गेली. इंग्लंडमध्ये किंग्जले हॉल' स्थापन करून भारतीय स्वातंत्र्य चळवळीवर लेख लिहून वृत्तपत्र छापून ब्रिटिशांमध्ये भारताबद्दल जागृती व सहानुभूती निर्माण केली. दुसऱ्या गोलमेज परिषदेस गांधीजी गेले त्यावेळी ते तेथेच राहिले होते.

भारतास झुंजार पत्रकारीतेची परंपरा आहेच, परंतु गांधीजींच्या विचारप्रभावाने महिला पत्रकारांनी ब्रिटिश शासनाला हलवून सोडले. मेरठ येथील उर्मिला बेबी या पत्रकार महिलेने १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीतील मिठाच्या सत्याग्रहात ३ हजार स्त्रियांना संघटीत केले होते. या काळात ४७ भाषणे तिने दिली होती. महिलांना सत्याग्रहात सामील होण्याची प्रेरणा दिली. नंतर तिला अटक झाली. जेलमधून सुटल्यानंतर जन्मभूमी नावाचे दैनिक तिने सुरू केले. १९४१ ला तिला पुन्हा अटक झली. गंभीर आजारामुळे तिला सोडण्यात आले. १९४२ मध्येच तिचा मृत्यू झाला. सुभद्रा जोशी नामक महिला पत्रकाराने १९४२ च्या आंदोलनात भूमिगत राहून 'हमारा संग्राम' नावाचे वृत्तपत्र चालविले. जनतेमध्ये स्वातंत्र्याचा संदेश पोहोचविण्याचे कार्ये केले. तिला पकडण्यात आले व 'हमारा संग्राम' बंद पडले. स्वातंत्र्यापर्यंत ती तुरुंगात होती. त्यानंतर ' सेक्युलर डेमॉक्रॉसी ' हे वृत्तपत्र तिने काही वर्षे चालविले.

अशाप्रकार गांधीजीच्या संपूर्ण राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांनी प्रथमच पत्नी व आई ही जबाबदारी निभावत योध्दया ची नवी भूमिका पार पाडली व स्त्रीशक्तीच्या विविध रूपांचे दर्शन घडविले हे त्यांच्या विचारांचे, व कार्याचे यश आहे.

## संदर्भ ग्रंथ


१. गांधी वाड्.मय - खंड २३
२. गांधी वाड्.मय - खंड २४
३. गांधी वाड्.मय - खंड २५
४. भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्त्रिया - संपादक नवाज मोदी
५. अज्ञात गांधी- माहादेभाई देसाई
६. स्वातंत्र्यचळवळीतील सोलापूरचे दिपस्तंभ- डॉ.श्रीकांत येळेगावकर
७. आम्ही बिघडलो- अनुसया लिमये
८. आहे मनोहर तरी - सुनिता देशपांडे
९. एक धागा सुताचा- कमला काकोडकर
१०. जीवन संघर्ष- डॉ.कमल अष्टपुत्रे
११. निशिगंध - मृणालिनी देसाई
१२. स्वातंत्र्यासैनिक चरित्र कोश - महाराष्ट्रराज्य खंड-१-१९७१
१३. गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र -स्वातंत्र्य चरित्रकोश खंड - १ १९७९